**L. A. BILL No. XLI OF 2023.**

A BILL

TO AMEND THE INSECTICIDES ACT, 1968, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१.

**कीटकनाशके अधिनियम, १९६८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९६८ चा ४६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, कीटकनाशके अधिनियम, १९६८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी १३२९ (१०४०—८-२०२३)

सन १९६८ चा अधिनियम क्रमांक ४६ मध्ये नवीन कलम २९क समाविष्ट करणे.

**२.** कीटकनाशके अधिनियम, १९६८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६८ चा ४६.

गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र असणे.

"**२९क.** या अधिनियमात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम २९ याच्या पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेले गुन्हे, दखलपात्र व अजामीनपात्र असतील.". १९७४ चा २.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

मानवास व पशुंना असलेल्या धोक्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, कीटकनाशकांची आयात, निर्मिती, विक्री, वाहतूक, वितरण व वापर यांचे विनिमयन करण्याकरिता आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता, कीटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) हा अधिनियमित केला आहे.

२. अनेक उत्पादक, व्यापारी व विक्रते गैर-छापाच्या कीटकनाशकांची निर्मिती व विक्री करण्यात गुंतलेले आहेत असे निदर्शनास आले आहे. अशा कीटकनाशकांची खरेदी करण्यामध्ये शेतकरी पैसे खर्च करतात त्याचा कीड व रोग यांचा प्रतिबंध करण्याकरिता कोणताही परिणाम होत नाही. परिणामी, कृषी उत्पादन घटल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. याशिवाय, अशा कीटकनाशकांचे अवशिष्ट घटक, मानवी आरोग्यास धोकादायक आहेत व त्यामुळे पर्यावरण प्रदूषण देखील होते. म्हणून, गैर-छापाच्या कीटकनाशकांची विक्री करण्यास मनाई करणे आणि त्या प्रयोजनासाठी, कीटकनाशके अधिनियम, १९६८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले गुन्हे, दखलपात्र व अजामीनपात्र करण्याकरिता, त्यामध्ये नवीन कलम २९क समाविष्ट करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **धनंजय मुंडे,**

दिनांक २ ऑगस्ट, २०२३. कृषी मंत्री.

## सन २०२३ चे वि.स.वि. क्र. ४१—कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

### (कीटकनाशके अधिनियम, १९६८ यातील उतारे.)

### (सन १९६८ चा अधिनियम ४६.)

**१.** ते **२८.** ** ** **

गुन्हे व शिक्षा.

**२९.** (१) जी कोणी व्यक्ती,—

(क) कलम ३-खंड (ट) च्या उपखंड (एक) किंवा उपखंड (तीन) किंवा उपखंड (आठ) खाली गैर छापाचे मानल्या जाणाऱ्या कोणत्याही कीटकनाशकाची आयात, निर्मिती किंवा विक्री करील अथवा विक्रीसाठी ते साठवील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा त्याचे वितरण करील ; किंवा

(ख) नोंदणी-प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही कीटनाशकाची आयात किंवा निर्मिती करील ; किंवा

(ग) लायसन नसताना कीटनाशकाची निर्मिती किंवा विक्री करील किंवा विक्रीसाठी ते साठवील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा त्याचे वितरण करील ; किंवा

(घ) कलम २७ चे व्यतिक्रमण करून, कीटनाशकाची विक्री किंवा वितरण करील ; किंवा

(ङ) कलम २७ खाली ज्याच्या वापरास मनाई करण्यात आली असेल अशा कीटनाशकाचा कोणत्याही कामगाराकरवी वापर करतील ; किंवा

(च) या अधिनियमाखाली किंवा त्यान्वये केलेल्या नियमांखाली एखादा कीटनाशकीय निरीक्षक आपल्या शक्तींचा वापर करीत असताना किंवा आपली कामे पार पाडीत असताना त्याला अटकाव करील,

ती व्यक्ती,—

(एक) पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याबद्दल, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नाही एवढ्या परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल ;

(दोन) दुसऱ्यांदा व त्यानंतर केलेल्या गुन्ह्याबद्दल, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी नाही एवढ्या परंतु पंचाहत्तर हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) जो कोणी या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून, एखाद्या कीटनाशकाचा वापर करील तो, पाचशे रुपयांपेक्षा कमी नाही एवढ्या परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र ठरेल.

(३) जो कोणी या अधिनियमाच्या अन्य उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे अथवा नोंदणी प्रमाणपत्राच्या किंवा त्याखाली दिलेल्या लायसनाच्या कोणत्याही शर्तीचे व्यतिक्रमण करील तो,—

(एक) पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याबद्दल, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाच हजार रुपयांपेक्षा कमी नाही एवढ्या परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल ;

(दोन) दुसऱ्यांदा व त्यानंतर केलेल्या गुन्ह्याबद्दल, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नाही एवढ्या परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(४) या अधिनियमाखाली एखाद्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने जर त्यानंतर तशाच प्रकारचा गुन्हा केला तर, ज्या न्यायालयासमोर त्या व्यक्तीची दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल त्या न्यायालयाने गुन्हेगाराचे नाव व राहण्याचे ठिकाण, गुन्हा व त्याला दिलेली शिक्षा या गोष्टी ते न्यायालय निर्देशित करील अशा वर्तमानपत्रांमध्ये किंवा अशा अन्य रीतीने प्रकाशित करवणे कायदेशीर ठरेल.

**३०.** ते **३८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१.]**

**[कीटकनाशके अधिनियम, १९६८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. धनंजय मुंडे,**
कृषी मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.